**ठळक बातम्या**

- इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ४७ टक्के वाढ
- अंतराळवीर शुभांशु शुक्ला उद्या मायदेशी परत येणार
- देशभरात श्रीकृष्णजन्म सोहळा साजरा/ महाराष्ट्रात दहीहंडीचा थरार/ एका गोविंदाचा मृत्यू तर ७५ जखमी

**आणि**

- ऑस्ट्रेलियाचे माजी अष्टपैलू क्रिकेटपटू बॉब सिम्पसन यांचं निधन

<><><><>

भारतातून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ४७ टक्के वाढ झाली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. ही वाढ गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीतली असून मेक इन इंडिया कार्यक्रमाची ही सफलता असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. २०१४-१५ यावर्षात इलेक्ट्रॉनिक उत्पादनांची निर्यात ३१ अब्ज डॉलर्स होती. ती यंदा १३३ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे.

<><><><>

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आज दक्षिण कोरियाचे परराष्ट्र मंत्री चो ह्युन यांच्यासोबत नवी दिल्लीत द्विपक्षीय बैठक घेतली. या बैठकीत दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये व्यापार, उत्पादन, सागरी क्षेत्र, लोकांमध्ये होणारा संवाद या क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्याबाबत फलदायी चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. दोन्ही नेत्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, ऊर्जा आणि संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये नवीन संधींबाबत चर्चा केल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांनी हिंद- प्रशांत क्षेत्र आणि सध्याच्या जागतिक घडामोडींवरही चर्चा केली. भारत आणि दक्षिण कोरिया मधल्या विशेष धोरणात्मक भागीदारीला दहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त दोन्ही देशांमध्ये मजबूत समन्वय आणि संबंधं असल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे.

ब्रिटनचे परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांनी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याशी आज दूरध्वनीद्वारे संवाद साधला. यावेळी युक्रेनमधल्या घडामोडी आणि इतर मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><>

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात आहे, असं उत्तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलं आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर सध्या सुनावणी सुरू आहे. कलम २०० आणि २०१ नुसार अशी कालमर्यादा घालता येत नाही, विधेयकांवर निर्णय घेणं हा राष्ट्रपती आणि राज्यपालांचा अधिकार आहे, असं मेहता यांनी आपल्या उत्तरात म्हटलं आहे.

<><><><>

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली बिहारमधल्या सासाराम इथून मतदान हक्क यात्रेला उद्यापासून सुरुवात होत आहे. १६ दिवस चालणारी ही यात्रा बिहारमधल्या २५ जिल्ह्यांमधून जाईल, अशी माहिती काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंह यांनी दिली. यात राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांच्यासह इंडिया आघाडीचे नेते सहभागी होतील. मतदारयाद्यांच्या सखोल पुनरिक्षणात झालेल्या त्रुटींबाबत या यात्रेदरम्यान माहिती देणार असल्याचं अखिलेश प्रसाद सिंह यांनी सांगितलं.

<><><><>

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरची १८ दिवसांची मोहीम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला मायदेशी परत यायला निघाले आहेत. उद्या ते भारतात पोहोचतील. १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतल्यानंतर ते पुनर्वसन कार्यक्रमात सहभागी झाले होते. या महत्त्वाच्या मोहिमेनंतर आपल्या कुटुंबियांना आणि आप्तेष्टांना भेटण्याची आतुरता शुक्ला यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे. आपल्या मूळ गावी लखनौला जाण्यापूर्वी ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना भेटणार आहेत.

<><><><>

देशात सर्वत्र कृष्णजन्म आणि गोपाळ काल्याचा सण उत्साहात साजरा झाला. ठिकठिकाणच्या श्रीकृष्ण मंदिरांमधे जन्मोत्सव काल मध्यरात्री साजरा झाला. भजन कीर्तनाचे कार्यक्रम आणि आकर्षक सजावट मंदिरांमधे करण्यात आली होती.

महाराष्ट्रात मुंबई शहर आणि उपनगरांत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी लाखो रुपये बक्षीस असलेल्या दहीहंड्यांचं आयोजन केलं होतं. ठाण्यात खासदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्प प्रतिष्ठानच्या दहीहंडी मधे दहा थर रचत कोकण नगरचा राजा गोविंदा पथकानं विश्वविक्रमाची नोंद केली. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी दहीहंडी उत्सवाला उपस्थिती लावली. अनेक ठिकाणच्या दहीहंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथकं अजूनही प्रयत्न करत आहेत. दरम्यान गोवंडी इथं दहीहंडी खेळताना बाल गोविंदा पथकातल्या एका गोविंदाचा मृत्यू झाल्यामुळे या उत्सवाला गालबोट लागलं. तर मुंबईत ७५ गोविंदा जखमी झाले.

उत्तर प्रदेशात मथुरा आणि वृंदावन शहरात श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यासाठी भाविकांनी गर्दी केली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज दुपारी मथुरा इथं श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिरात प्रार्थना केली.

दिल्लीत मोठ्या उत्साहात गोपाळकाला साजरा झाला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी कैलास इथल्या इस्कॉन मंदिरात भगवान कृष्णाची आरती केली.

**<><><><>**

युक्रेन युद्ध समाप्तीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात काल अलास्का इथं तीन तास चर्चा झाली, मात्र शस्त्रसंधीची घोषणा झाली नाही. या बैठकीनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ट्रम्प यांनी अतिशय सकारात्मक चर्चा झाल्याचं आणि अनेक मुद्द्यांवर सहमती झाल्याचं सांगितलं. ही वाटचाल अशीच सुरू राहिली, तर **युक्रेनबरोबरचं** युद्ध लवकरच संपेल, असा विश्वास रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी व्यक्त केला. ट्रम्प यांच्यासोबतच्या चर्चेची पुढची फेरी मॉस्को इथं व्हावी, असा प्रस्ताव त्यांनी ठेवला.

युक्रेनचे अध्यक्ष वोलिदिमिर झेलेन्स्की येत्या सोमवारी डोनाल्ड ट्रम्प यांची अमेरिकेत भेट घेणार आहेत.

ट्रंप आणि पुतीन यांच्या भेटीचं भारतानं स्वागत केलं आहे.

<><><>

भारत प्रथमच सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय हिवाळी क्रीडा स्पर्धेचं यजमानपद भूषवणार आहे. उत्तराखंडमधल्या देहरादून इथं येत्या २० ते २३ ऑगस्ट दरम्यान आशियाई खुल्या शॉर्ट ट्रॅक जलद स्केटिंग चषक स्पर्धेचं आयोजन केलं जाणार आहे.

महाराणा प्रताप क्रीडा महाविद्यालयात होणाऱ्या या स्पर्धेत ११ हून अधिक आशियाई देश सहभागी होणार आहेत, अशी माहिती आइस स्केटिंग असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेचे अध्यक्ष अमिताभ शर्मा यांनी दिली आहे.

या देशांमध्ये भारतासह चीन, जपान, हाँगकाँग, इंडोनेशिया, सिंगापूर, थायलंड, चिनी तैपेई, व्हिएतनाम, मलेशिया, फिलीपिन्स या देशांचा समावेश आहे.

स्पर्धेत ९ वेगवेगळ्या प्रकारात स्पर्धक आपलं कौशल्य दाखवतील.

<><><>

भारतीय स्क्वाशपटू अनाहत सिंहनं ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या एनएसडब्ल्यू बेगा खुल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत तिनं इजिप्तच्या स्क्वाशपटू नूर हिचा ५४ मिनिटात ३-२ नं पराभव केला. अंतिम फेरीत तिचा सामना इजिप्तच्या हबीबा हिच्याशी होईल. हबीबानं उपांत्य फेरीत आकांक्षा साळुंखे हिचा ३-१ नं पराभव केला.

<><><>

ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू बॉब सिम्पसन यांचं आज निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. अष्टपैलू क्रिकेटपटू असलेल्या सिम्पसन यांनी ऑस्ट्रेलियाच्या संघाचं कर्णधारपद भूषवलं होतं. ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या पुनरुज्जीवनात त्यांचं योगदान महत्त्वपूर्ण मानलं जातं. १९८० आणि १९९० च्या दशकात ऑस्ट्रेलियाच्या संघाचे ते प्रशिक्षक होते.

सिम्पसन यांनी १९५७ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी पदार्पण केलं. त्यांनी ६२ कसोटी सामने खेळले असून ४ हजार ८६९ धावा केल्या. यामध्ये १० शतकं आणि २७ अर्धशतकांचा समावेश होता. उत्तम लेग स्पिनर असलेल्या सिम्पसन यांनी ७१ गडी बाद केले होते.

<><><>

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं आज पुण्यात निधन झालं. त्या ६९ वर्षांच्या होत्या. 'गुरू', 'मी सिंधूताई सपकाळ', 'तिचा उंबरठा' या चित्रपटांमध्ये, तर 'मिसेस

आमदार सौभाग्यवती' या आणि अनेक नाटकात त्यांनी भूमिका साकारल्या. अनेक दूरचित्रवाहिनी मालिकांमध्ये ही त्यांनी काम केलं होतं. त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्या त्या मातोश्री होत्या.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात चसोटी इथं झालेल्या ढगफुटीनंतर मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. आत्तापर्यंत किमान ६० जणांचा मृत्यू झाला असून १०० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत.

**//<><><><>//**